# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

तारीखः- 03/03/2018

## कोटेशन नोटीस

भिवंडी निजामपूर शहर महानगरपलिका महापालिकेच्या वाहन विभागात खालील कामाची कोटेशन दि. 12/03/२०18 रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत मागविणेत येत आहेत. कामाबाबतची संपुर्ण माहिती वाहन व्यवस्थापक, वाहन विभाग यांचे कडून घेऊनच कोटेशन भरावीत मागाहुन कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सर्व करांसहित व खर्चासहित भरावीत. मागाहून कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही. कमी किंवा जास्त दराची कोटेशन नाकारणेचा अधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. उशिरा आणलेली कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारली जाणार नाहीत.

---

**अग्निशमन विभागाकडील मनपा वाहन फायर इंजिन क्र. एम.एच.०४.एएम.२०३ ची दुरुस्ती.:-**

**१) पाण्याची टाकीची दुरुस्ती** :- पाण्याची टाकी जास्त प्रमाणात लिकेज असल्यामुळे सदर गाडीची पाहणी करुन सदर गाडीच्या वरच्या दोन्ही बाजुचे पत्र्यांची रिव्हीटिग काढुन दोन्ही बाजुचे पत्रे काढुन पाण्याची टाकीचे फाऊंडेशन खोलुन मेन पाईप लाईन व बटर फ्लाय व्हॉल खोलुन क्रेनच्या साह्याने टाकीला उचलुन बाजुला काढणे सर्व प्रथम सदर टाकीच्या खालच्या बाजुस सडलेला पत्रा गॅस कटरने कापुन त्या ठिकाणी ५ mm चे १X१ फुट नविन पत्रा वेल्डींग व ग्रॅन्डीग करुन पुर्ण वेल्डींग ला कारपेच मारणे नंतर सदर टाकीच्या दोन्ही साईडच्या बाजुस सडलेला पत्रा गॅस कटरने कापुन त्या जागी ठिकाणी ५ mm चे १X१ फुट नविन पत्रा वेल्डींग व ग्रॅन्डीग करुन पुर्ण वेल्डींग ला कारपेच मारणे त्यानंतर टाकीच्या पुढील व मागील बाजुस सडलेला पत्रा गॅस कटरने कापुन त्या ठिकाणी ५ mm चे १X१ फुट नविन पत्रा वेल्डींग व ग्रॅन्डीग करुन पुर्ण वेल्डींग ला कारपेच मारणे शेवटी टाकीच्या वरच्या बाजुस (टॉपला) संपुर्ण सडलेला पत्रा कापुन ४mm चे ८X४ फुट साईजचे ४ पत्र्याचे शिट वेल्डींग करणे. त्यानंतर संपुर्ण टाकीच्या आतल्या बाजुस फायबर कलर कोटींग करुन पुर्ण लिकेज बंद करणे. सदर टाकी संपुर्ण चेक करुन क्रेन च्या साह्याने उचलुन पुन्हा त्याच ठिकाणी फिट करणे तद्नंतर संपुर्ण फाऊंडेशनचे नविन नट बोल्ट व सपोर्ट पॅड फिट करुन फाऊंडेशन फिट करणे. वरच्या दोन्ही बाजुचे पत्रे पुन्हा रिव्हीटिंग करुन पाईप लाईन फिट करणे. बटर फ्लाय व्हॉल ची नविन पॅकिंग फिट करणे.

**२) PTO ची दुरुस्ती** :- जॉईन्ट चे सर्व नट बोल्ट खोलुन, कुलींग पाईप काढुन PTO गिअर बॉक्स चे फाऊंडेशन चे नट बोल्ट खोलुन जॅक च्या साह्याने PTO गिअर बॉक्स खाली उतरवून बाजुला करुन जुना गिअर ऑईल पुर्ण बाहेर काढुन PTO गिअर बॉक्स ला पुर्ण डिसमेन्टलिंग करुन खराब झालेले बेरींग व गिअर बाहेर काढुन तसेच ऑईल सिल व सरक्लिप बाहेर काढुन त्याजागी नविन बेरींग, ६३०९ = ०३ नग, ६२०९ = ०१ नग, ६२०४ = ०१ नग, ६०.८०.१० ऑईल सिल = ०२ नग, T १०.८०.८ = ०२ नग, व ६१.४८.०८ = ०२ नग तसेच ४५mm ची आऊट साईट सरक्लिप = ०२ नग, ९०mm ची इनर सरक्लिप = ०४ नग प्रेस च्या साह्याने फिटींग करुन तसेच PTO फाऊंडेशन चे नट बोल्ट व जॉईन्ट चे सर्व नट बोल्ट १६ नग नविन फिट करुन ९० नंबर ०५ लि. ऑईल भरुन PTO ची दुरुस्ती करुन रिफिटींग करणे.

Choudhari

वाहन व्यवस्थापक,
भि. नि. शहर महानगरपालिका, भिवंडी.

---

तारीखः- 03/03/2018
खालील ठिकाणी प्रसिध्द केली.
१) मनपा संकेतस्थळ,
२) मुख्य कार्यालय नोटीस बोर्ड